आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३० जून २०२६ - मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- मोसमी पावसाचं आगमन लांबणीवर पडल्यामुळे खरीपाच्या पेरण्यांत घट
- महाराष्ट्रात विधानपरिषद उपसभापतीपदासाठी सचिन अहिर यांचा महायुतीच्या पाठिंब्यावर अर्ज दाखल
- ३१वे लष्करप्रमुख म्हणून जनरल धीरज सेठ यांनी स्वीकारला पदभार
- अमेरिका आणि इराणमध्ये आज कतारची राजधानी दोहा इथं चर्चा होणार असल्याचं वृत्त इराणने फेटाळलं

**आणि**

- आशियाई क्रीडास्पर्धांसाठी भारतीय महिला क्रिकेट संघ जाहीर

<><><><><>

मान्सूनच्या पावसाचं आगमन लांबणीवर पडल्यामुळे देशात यंदा खरीप पिकाची पेरणी कमी प्रमाणात झाल्याचं कृषी मंत्रालयाने म्हटलं आहे. जून महिन्यात १८२ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे, गेल्यावर्षी याच काळात २३६ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती, त्यामुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत यावर्षी पेरणीत २३ टक्के घट झाली आहे. भात, तेलबिया, भरड धान्य, कडधान्य, कापूस या सर्व पिकांवर पाऊस उशीरा आल्यामुळे परिणाम झाल्याचं कृषी मंत्रालयाने सांगितलं.
भात पेरणीत २५ टक्क्यापेक्षा जास्त घट झाली आहे, कडधान्यात ३० टक्के, तेलबिया ५० टक्के तर कापूस लागवडीत ३४ टक्के घट झाली आहे.
दुसरीकडे उसाच्या लागवडीत ५७ टक्के वाढ झाल्याचं कृषी मंत्रालयाने सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापतीपदाच्या निवडणुकीसाठी सचिन अहिर यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार, नीलम गोऱ्हे, चंद्रकांत पाटील, संजय राठोड, संजय शिरसाट आदी नेते यावेळी उपस्थित होते. अहिर हे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आहेत, मात्र त्यांना महायुतीने निवडणुकीसाठी पाठिंबा दिला आहे. विधानपरिषदेचे सभापती, उपसभापती आणि विधानसभा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांना पक्षांतर बंदी कायदा लागू होत नाही, असं राजकीय विश्लेषकांनी सांगितलं.

सचिन अहिर हे प्रकल्पग्रस्त, कामगार अशा समाजातल्या अनेक घटकांसाठी काम करत असतात, त्यांना उपसभापतीपदाची जबाबदारी दिल्यामुळे शिवसेनेला आणि सभागृहाला याचा फायदा होईल अशी प्रतिक्रिया विधानपरिषदेच्या माजी उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी बातमीदारांशी बोलताना दिली.
विधानपरिषदेच्या उपसभापती पदाची निवडणूक उद्या होणार आहे.

**अनुसूचित** जातींच्या उपवर्गीकरणाबाबत कोणताही कायदा सरकारनं या अधिवेशनात आणलेला नाही, यासंदर्भात नेमलेल्या बदर समितीच्या अहवालावर सूचना, हरकती विचारात घेऊनच व्यापक चर्चेअंती अंतिम निर्णय घेऊ, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. उपवर्गीकरणाला विरोध नोंदवत या विषयावर बोलू देण्याची मागणी विरोधकांनी केली. अध्यक्षांनी त्यांना जागेवर बसायची सूचना केली, मात्र विरोधकांनी बोलू देण्याची मागणी लावून धरली आणि ती मान्य न झाल्याने सभात्याग केला.

**सन** २०२३ ते मे २०२६ या कालावधीत राज्यात स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून महिलांचं शोषण, लैंगिक छळाच्या एकंदर ४ घटना, तर सक्तीच्या धर्मांतराची १ घटना घडल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली.

**राज्यात** अनेक जण परफॉर्मन्स परवाना घेऊन डान्सबार चालवत आहेत, मात्र डान्सबारच्या कायद्यानुसारच हे परवाने घ्यावे लागतील अशी दुरुस्ती महाराष्ट्र पोलीस कायद्यांतर्गत आणू अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी सभागृहात केली.

<><><><><>

कृषी क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय विकसित भारताचे स्वप्न साकार करता येणार नाही, असं मत केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी व्यक्त केलं. ते आज हरियाणात हिसार इथं खेत बचाओ अभियानाच्या कार्यक्रमात बोलत होते. शेतकऱ्यांना मृदा स्थिती आणि आवश्यक खतांचं प्रमाण याबाबत माहिती देणारं ॲप तयार करण्याचा प्रयत्न सरकार करत असल्याचं त्यांनी सांगितलं. मृदा आरोग्य राखण्यासाठी शेतकऱ्यांनी संतुलित प्रमाणात खतं आणि कीटकनाशकांचा वापर करावा, तसंच नैसर्गिक शेतीकडे वळावं  असं आवाहन त्यांनी केलं.

**….. होल्ड- बाईट - शिवराज सिंग चौहान**

एल निनोचा प्रभाव कमी करण्यासाठी सरकार प्रयत्न करत आहे, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्रात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण प्रक्रियेला आजपासून सुरूवात झाली. याअंतर्गत येत्या २९ जुलै पर्यंत बूथस्तरीय अधिकारी घरोघरी प्रत्यक्ष भेट देऊन गणना अर्ज वाटप करतील आणि भरलेले अर्ज परत घेतील. त्यानंतर येत्या पाच ऑगस्ट रोजी प्रारुप मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. त्यानंतर चार सप्टेंबर पर्यंत प्रारुप यादीवर दावे आणि हरकती नोंदवता येतील, आणि सात ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जातील. या प्रक्रियेसाठी राज्यात एक लाखाहून अधिक बीएलओ नियुक्त करण्यात आले आहेत.

नांदेड जिल्ह्यात सुमारे २७ लाख ७७ हजार मतदारांचं विशेष सखोल पुनरिक्षण केलं जाणार आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारनं वस्तू आणि सेवा कर अपील न्यायाधिकरणासमोर अपील करण्याची मुदत ३१ जुलै पर्यंत वाढवली आहे. गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये जारी केलेल्या अधिसूचनेनुसार अपील करण्याची मुदत ३० जून होती.  मात्र, अपील दाखल करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे अनेक घटकांनी केलेल्या मागणीवरून ही मुदतवाढ केली आहे.

**<><><><>**

जनरल धीरज सेठ यांनी भारतीय सेनेचे ३१वे प्रमुख म्हणून कार्यभार स्वीकारला. या आधीचे लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी आज सेवानिवृत्त झाले. निवृत्त होताना त्यांनी भारतीय सैन्याच्या आणि सैनिकांच्या समर्पण वृत्तीला सलाम केला…

**बाईट- उपेंद्र द्विवेदी**

**<><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धस्थितीमुळे पेट्रोल आणि डिझेलच्या विक्री आणि वितरणावर घातलेले निर्बंध मागं घेण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. उद्या म्हणजे एक जुलैपासून सार्वजनिक तेल कंपन्यांच्या विक्री केंद्रांवर आधीचे निर्बंध लागू होणार नाहीत, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं म्हटलं आहे. गेल्या बारा जूनपासून  उच्च क्षमतेचं पेट्रोल आणि डिझेल खरेदीसाठी प्रति व्यक्ती दोनशे लिटरपर्यंतची मर्यादा लागू करण्यात आली होती. इंधनाचा काळा बाजार होऊ नये यासाठी हे पाऊल उचलण्यात आलं होतं. मात्र, आता इंधन साठ्याच्या पुरवठ्याचा आढावा घेतल्यानंतर हे निर्बंध सरकारनं हटवले आहेत.

**<><><><>**

अमेरिका आणि इराणमध्ये आज होर्मुझ सामुद्रधुनीबाबतच्या वादासंदर्भात कतारची राजधानी दोहा इथं चर्चा होणार असल्याचं अमेरिकेन जाहीर केल्यानंतर

इराणने हे वृत्त फेटाळलंआहे. इराणने सादर केलेल्या १४ कलमी मसुद्यावर तातडीनं चर्चा हे आपलं प्रथम उद्दिष्ट असल्याचं इराणने म्हटलं आहे. अमेरिकेने दिलेला शब्द आणि जबाबदारी पाळली तर इराणही आपलं वचन पाळेल असं इराणचे अध्यक्ष मसऊद पेझेश्कियान यांनी स्पष्ट केलं आहे. दोन्ही पक्षांच्या परस्परविरोधी दाव्यांमुळे आखातात तणाव अद्याप कायम आहे.

**<><><><><>**

भारतानं ऑपरेशन अमिस्ताद अंतर्गत, भूकंपग्रस्त व्हेनेझुएलाला पाठवल्या जाणाऱ्या मानवतावादी मदतीचा ओघ वाढवत, संकटग्रस्तांना वैद्यकीय मदत आणि आपत्कालीन मदत पुरवण्यावर भर दिला आहे. अशी माहिती व्हेनेझुएलामधल्या काराकास इथल्या भारतीय दूतावासानं समाज माध्यम संदेशाद्वारे दिली आहे. मदतकार्यासाठी गेलेल्या भारतीय लष्कराच्या तुकडीने यापूर्वीच तातडीनं वैद्यकीय सेवा पुरवण्यासाठी तात्पुरतं रुग्णालय उभं केलं आहे.

**<><><><><>**

पाकिस्ताननं अफगाणिस्तानवर केलेल्या हवाई हल्ल्यांचा भारतानं तीव्र निषेध केला आहे. पाकिस्तानची ही कृती अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्वावरचा हल्ला असून प्रादेशिक शांतता आणि स्थैर्यासाठी मोठा धोका आहे, असं परराष्ट्र मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. देशांतर्गत अपयश झाकण्यासाठी सीमापार हिंसक कारवाया करण्याचा हा पाकिस्तानचा निष्फळ प्रयत्न असल्याचंही या निवेदनात म्हटलं आहे. भारतानं अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला आपला पाठिंबा असल्याचा पुनरुच्चार केला .

अफगाणिस्तानावर पाकिस्ताननं केलेल्या हल्ल्यांचा अनेक जागतिक नेत्यांनी आणि आंतरराष्ट्रीय समुदायानं तीव्र निषेध केला आहे. गेल्या रविवारी रात्री झालेल्या हल्ल्यात ३६ नागरिक ठार तर १६३ जण जखमी झाले आहेत, अशी माहिती तालिबानचे उपप्रवक्ते हमदुल्लाह फितरत यांनी दिली.

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी तीव्र चिंता व्यक्त करत अशा कारवाया तातडीनं थांबवण्याचं आवाहन केलं. युरोपियन संघानं तणाव तात्काळ कमी करण्याचं आणि संयम बाळगण्याचं आवाहन केलं.

दरम्यान, काल अफगाणिस्तानच्या परराष्ट्र मंत्रालयानं पाकिस्तानी दूतावासातल्या अधिकाऱ्यांसमोर हवाई हद्दीचं उल्लंघन तसंच नागरिकांच्या घरांवर करण्यात आलेल्या हवाई हल्ल्यांबाबत तीव्र निषेध नोंदवला.

<><><><><>

येत्या सप्टेंबरमधे जपानमधे होणाऱ्या आशियाई क्रीडास्पर्धांसाठी भारताचा महिला क्रिकेट संघ जाहीर झाला आहे. कर्णधारपदाची धुरा हरमनप्रीत कौरवर सोपवण्यात आली असून स्मृती मानधना उपकर्णधार असेल. गतविजेत्या भारतीय संघात यंदा शेफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्स, दीप्ती शर्मा, ऋचा घोष,जी कमलिनी, भारती फुलमाळी, श्रीचरणी, रेणुका ठाकूर, क्रांती गौड, अरुंधती रेड्डी यांचा समावेश आहे. अष्टपैलू श्रीयंका पाटील तंदुरुस्त असल्यास सामने खेळेल.

२०२८ च्या लॉस एंजलिस ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय महिला क्रिकेट संघ पहिल्यांदाच पात्र ठरला आहे. ऑस्ट्रेलिया, ग्रेट ब्रिटन आणि दक्षिण आफ्रिका हे पात्र ठरलेले इतर संघ आहेत.

//<><><><><>//